# समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा ता. वडसा देसाईगंज जि.गडचिरोली.

## सशस्त्र पोलीस शिपाई २०२२-२३ तात्पुरती निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणी

दिनांक १४/०८/२०२४

शासन निर्णय, महाराष्ट्र शासन अधिनियम, मार्गदर्शन तत्वे व मा.पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. अपोमसं/प्रशिक्षण/पो.शि.भरती २०२२-२०२३/१७३/२०२३, दिनांक ०६/०६/२०२४ मधील पोलीस भरती कार्यपध्दतीनुसार राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा ता.वडसा देसाईगंज जि.गडचिरोली या आस्थापनेची सशस्त्र पोलीस भरती प्रक्रिया २०२२-२०२३ मधील उमेदवारांची गुणवत्तेनुसार तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर यादी ही तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी असून यामध्ये नावाचा समावेश झाला असे समजून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येऊ नये. **सशस्त्र पोलीस भरती प्रक्रिया दरम्यान नियमानुसार आवश्यक ते बदल /निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.**

मैदानी व लेखी चाचणीमध्ये उमेदवारांना प्राप्त गुणांच्या आधारे तयार करण्यात आलेली तात्पुरती निवड यादी सोबत जोडल्याप्रमाणे **(Provisional Selection List & Provisional Waiting List)** उमदेवारांच्या माहिती करीता राज्य राखीव पोलीस बल यांचे https://www.maharashtrasrpf.gov.in व www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना दिनांक 05/08/2024 व दुसरी संधी दिनांक 12/08/2024 रोजी राज्य राखीव पोलीस बल गट क्र. 13, वडसा देसाईगंज जि.गडचिरोली येथे कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीकरीता सर्व मुळ कागदपत्रांसह व त्यांच्या छायांकित प्रतीसह बोलविण्यात आले होते **परंतु काही उमेदवार दिलेल्या दिनांक रोजी उपस्थित राहु शकले नाही याकरीता तात्पुरत्या निवड व प्रतिक्षा यादीतील उर्वरित असलेले उमेदवारांनी कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणी करीता दिनांक 23/08/2024 रोजी सकाळी 10.00 वा. ( अंतिम संधी ) देण्यात येत आहे. उक्त दिनांक 23/08/2024 रोजी नंतर संबंधित उमेदवारांस अपात्र घोषित करण्यात येईल. दिनांक 05/08/2024 व 12/08/2024 रोजी कागदपत्र पडताळणी करीता हजर असलेले निवड / प्रतिक्षा यादीतील संबंधित उमेदवार यांनी या कार्यालयास सदरील पोलीस भरतीतील तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादी नुसार निवड रद्द होण्याकरीता केलेला इच्छुक विनंती अर्ज, हमीपत्र लिहुन दिले असुन त्यांना अपात्रतेचे समजपत्र देण्यात आले आहे. त्यांची नावे खालील तात्पुरती निवड व प्रतिक्षा यादीतुन वगळण्यात आले आहे.** तसेच तात्पुरती निवड / प्रतिक्षा यादीतुन गैरहजर उमेदवारांची नावे रद्द करण्यात येईल. उक्त पदावर आपण कोणताही कायदेशीर हक्क, दावा किंवा आक्षेप वैध राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**तात्पुरत्या निवड यादीमधील व तात्पुरत्या प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांनी कागदपत्र / प्रमाणपत्र पडताळणीकरीता सर्व मुळ कागदपत्रांसह व त्यांच्या छायांकित प्रतीसह दिनांक 23.08.2024 रोजी सकाळी 10:00 वा. राज्य राखीव पोलीस बल गट क्र. 13, वडसा देसाईगंज जि.गडचिरोली येथे वेळेत उपस्थित रहावे.**

खालील नमुद कागदपत्र पडताळणी **( अंतिम संधी )** करीता दिलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहिल्यास तसेच कागदपत्रांची पुर्तता न केल्यास संबंधित उमेदवारास अपात्र घोषित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१. कागदपत्र पडताळणीबाबतचे संपुर्ण मुळ प्रमाणपत्रे व कागदपत्रे आवेदन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक १५/०४/२०२४ किंवा त्यापुर्वी उमेदवारांनी प्राप्त केलेले असावे.

**(उदा. १. SSC / HSC उत्तीर्ण प्रमाणपत्र, २. जन्म दाखला, ३. रहिवाशी प्रमाणपत्र, ४. जातीचे प्रमाणपत्र, ५. जातवैधता प्रमाणपत्र, ६. संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, ७. खेळाडु प्रमाणपत्र व पडताळणी अहवाल (शासन निर्णय दि. १७/०३/२०१७, व दि. ११/०३/२०१९ प्रमाणे) ८. अ.जाती, अ.जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता ईतर मागासवींय उमेदवारांकरीता नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्र, ९. माजी सैनिक उमेदवार करीता Discharge प्रमाणपत्र, १०. गृहरक्षक दलाकरीता आवश्यक असलेले प्रमाणपत्र, ११. प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र, १२. भुकंपग्रस्त प्रमाणपत्र, १३.**

पोलीस पाल्य प्रमाणपत्र १४. अनाथाबाबतचे प्रमाणपत्र १५.अंशकालीन प्रमाणपत्र १६. ईडब्ल्युएस प्रमाणपत्र १७.एसईबीसी प्रमाणपत्र १८.बोनाफाईड मुळ प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (TC) ईत्यादी.)

२. एसईबीसी उमेदवारांनी एसईबीसी व नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र प्राप्त होण्याकरीता तहसिल किंवा सेतु अथवा संबंधित कार्यालयास दिनांक १५/०४/२०२४ रोजी किंवा त्यापुर्वी अर्ज सादर केल्याची पोचपावती व एसईबीसीचे मुळ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

३. विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, विशेष मागास वर्ग, ईतर मागास वर्ग, सामाजिक/ शैक्षणिक मागास वर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या मागास प्रवर्गातील उमेदवार यांनी मुळ कागदपत्र तपासणीवेळी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिका-याने दिलेले लगतच्या आर्थिक वर्षाचे म्हणजे सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाचे मुळ नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non-Creay Layer Certificate) सादर करणे आवश्यक राहिल.

४. तसेच ऑनलाईन आवेदन अर्जाची प्रत, मैदानी चाचणी प्रवेशपत्र, लेखी परिक्षा प्रवेशपत्र, या गटाचे मैदानी चाचणी दरम्यान देण्यात आलेले ओळखपत्र व ईतर वैयक्तिक ओळखपत्र (मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड ई.) व ०२ पासपोर्ट साईज फोटो सादर करणे अनिवार्य राहिल.

५. वर नमुद प्रमाणे मुळ कागदपत्रे व त्याबाबतच्या ०२ छायांकित प्रती (साक्षांकित केलेल्या) सादर करणे अनिवार्य राहिल. सदरची कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवाराला पोलीस भरती प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल, याबाबत सर्वस्वी जबाबदारी उमेदवार यांची राहिल.

६. कागदपत्र पडताळणीकरीता देण्यात आलेले ठिकाण, दिनांक व वेळेस उमेदवार उपस्थित न राहिल्यास सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३ प्रक्रियेतुन अपात्र करण्यात येईल व कोणत्याही सबबीवर पुन:श्च संधी देण्यात येणार नाही, याबाबत नोंद घ्यावी.

७. सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३ संदर्भात कोणतेही आक्षेप निर्माण झाल्यास अंतिम निर्णय घेण्याचे सर्व प्राधिकार भरती निवड यांना राहतील.

(भाग्यश्री नवटके भा.पो.से)
समादेशक
रा.रा.पो.बल गट क्र.१३ विसोरा
ता.वडसा देसाईगंज जि.गडचिरोली
अतिरिक्त कार्यभार

**माहिती व प्रसिद्धीकरीता सविनय सादर,**

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. ( **लक्षवेध** :- compcell.dgoffice@mahapolice.gov.in )

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

1. मा. अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
2. मा. अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
3. मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपुर परिक्षेत्र, नागपुर.